Vol 3 Issue 10 Nov 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-10, Nov-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# अस्तित्ववाद आणि 'गौरी देशपांडे यांचे साहित्य

**महादेव पंढरीनाथ वाळुंज**

'शिवनेरी',लक्ष्मीमातामंदिराजवळ, अंबिकानगर, मु.पो,ता. इंदापूर जि. पुणे

***सारांश :1. अस्तित्ववाद :–***

अस्तित्ववादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी म्हणजे 1940 ते 1950 या कालखंडात युरोपीय संस्कृतीत मानवी अस्तित्वाच्या आणि स्वातंत्र्याचा एक नवा अर्थ सांगणारी, एक वैचारिक अन् वाड्.मयीन चळवळ उदयास आली. ती अस्तित्ववाद या नावाने ओळखली जाते. अस्तित्ववाद जशी एक चळवळ, एक आंदोलन आहे, तसेच ते एक दर्शनही आहे.

अस्तित्ववादाचा प्रवर्तक किर्केगार्द म्हणतात की, ''मानवापुढील मुख्य प्रश्न विश्वाचा नाही, शाश्वताचाही व ज्ञानाचाही नाही तर मनुश्याच्या को–या अस्तित्वाचा आहे. मनुश्य आहे येथूनच तत्त्वचिंतनाची सुरूवात केली पाहिजे. कारण बाकी सारे आहे किंवा नाही याचा विचारही या मानवाच्या अस्तित्वावरच अवलंबून आहे, तर 'माणसाला अर्थसमक्ष जगणे भाग आहे आणि वंचनेच्या किंवा वैफल्याच्या धाकात जगणेही भाग आहे. 'परमसत्य मला गवसले' अशी कृतार्थता व आनंद माणसाला मिळूच शकत नाही' अशी अस्तित्ववादी भूमिका [1]आहे.'

***प्रस्तावना :***

स्वतःचे इतरांचे आणि भोवतालच्या जगाचे असतेपण हे काही अपरिहार्य नाही. या सर्वांचे नसतेपणसुध्दा असू शकते ही जाणीव मन व्याकूळ करणारी व व्यथेला जन्म देणारी आहे. मानवी अस्तित्वाला स्थिर, शाश्वत मूल्य नाहीत. ते कोणत्याही क्षणी थांबू वा नष्ट होऊ शकते. अस्तित्व हा नियम नव्हे तर नसणे हाच नियम आहे. अस्तित्व ही केवळ नसण्याआधीची अवस्था आहे व मानवी अस्तित्वाला स्थल–काळाच्या मर्यादा आहेत आणि जीवनाबद्दलचा अर्थशून्य दृष्टीकोन अस्तित्ववादात सर्वसामान्यपणे दिसून येतो.

'मृत्यू' ही मानवी जीवनामधील सार्वत्रिक स्वरूपाची अपरिहार्य घटना आहे. या घटनेला अस्तित्ववादात महत्त्वाचे स्थान आहे. त्यातही 'मृत्यू' या प्रत्यक्ष घटनेपेक्षा या घटनेच्या जाणिवेला महत्त्व आहे. या जाणिवेने आपला स्वतःच्या अस्तित्वाबद्दलचा दृष्टीकोण आणि भोवतालच्या जगाकडे पाहण्याच्या दृष्टीकोण हे अधिक वास्तवतेच्या पातळीवर येण्यास मदत होते असे अस्तित्ववाद मानतात.

'जीवनाची निरर्थकता, हेतुशून्यता स्वीकारून, धार्मिक, अवैचारिक श्रध्देच्या अंधारात उडी न मारता प्रामाणिकपणे, निर्णय स्वातंत्र्याच्या आधरावर जीवन जगण्याचे आवाहन अस्तित्ववादी दर्शन आपणास करते' [2]असे दि. के. बेडेकर म्हणतात.

## *2. अस्तित्ववादाची वैाशिष्टये :–*

1 अस्तित्ववादाची वैाशिष्टये म्हणजे 1)ईश्वरकेंद्री विश्वापेक्षा मानवनिर्मित व मानवकेंद्री विश्वाचा शोध घेणे.2)स्वातंत्र्य हे मानवाचं सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. ते मिळवायचं नसतं ते स्वतःच्या स्वतंत्र कृतीनं निर्माण करायचं असतं. 3)मानवी अस्तित्वादाचा शोध घेणे. 4) प्रत्येक व्यक्तीने निर्णयाचे व कृतीचे पाऊल स्वतः टाकावे व परिणाम भोगण्यास धैर्याने तयार राहावे. व्यवस्थेला शरण जावू नये हे अस्तित्ववाद्यांचे मुख्य जीवनसूत्र आहे. 5)आत्मदुराव्याने पछाडलेल्या माणसाला त्याच्या व्यक्तिनिष्ठ अस्तित्वाच्या वास्तवतेचे दर्शन घडवणे हे अस्तित्ववादाचे कार्य आहे. 6)स्वतःची वास्तवता लक्षात घेऊन ती स्वीकारून त्याची जाणीव ठेवून जगलेले जीवन हे अधिक अस्सल जीवन असे अस्तित्ववादी मानतात. 7) इ. एल. ॲलन म्हणतात,'' आजपर्यंतच्या परंपरेप्रमाणे निरीक्षकाच्या भूमिकेतून तत्वचिंतन करण्याऐवजी भोक्त्याच्या भूमिकेतून तत्वचिंतन करण्याचा प्रयत्न म्हणजे अस्तित्ववादी तत्वज्ञान होय''. 8)जीवनाची वास्तवता स्वीकारून या वास्तवतेत अंतर्भूत असलेले सर्व हलाहल पचवून धैर्याने जीवन जगण्याची शिकवण अस्तित्ववादात अभिप्रेत आहे. 9) आपल्या जीवनासंबंधी आपला निर्णय पूर्णपणे आपणच घ्यावयास हवा व त्याच्या परिणामांची जबाबदारीपण स्वीकारायला हवी. असे अस्तित्ववादी सांगातात. अशी काही वैशिष्टये साधारणपणे अस्तित्ववादाची सांगितली जातात. या वैशिश्टयांच्या असंख्य पाऊल खुणा गौरी देशपांडे यांच्या साहित्यात पहावयास मिळतात.

## *3. अस्तित्ववाद आणि 'गौरी देशपांडे यांचे साहित्य :–*

कोणत्या साहित्याला अस्तित्ववादी साहित्य म्हणावे या संबंधी गंगाधर पाटील म्हणतात,''अस्तित्ववाद्यांना मानवी अस्तित्वाचं आणि विश्वाचं एक नव आकलन झालं. त्या आकलनाच्या आणि ज्ञानाच्या प्रकाशात मानवी अस्तित्वाच्या तळाशी असणा–या अनेक अंतर्विरोधांची जाणीव झाली. त्यामुळं मानवी अस्तित्वाचं सामर्थ्य व मर्यादा याचं यथोचित भान आलं. आपल्या ज्ञानाच्या मर्यादाही त्यांना कळून आल्या. अशा परिस्थितीत 'शेजा–यावर प्रेम करा', 'समतेचा ध्वज उंच धरा', 'निष्काम कर्म करा' अशा बाहेरून ठोक आज्ञा देणं व रामबाण उपाय सूचविणं अस्तित्ववाद्यांना अपराध्यासारखं वाटू लागलं. अशा अपूर्ण व मर्यादित ज्ञानाच्या बळावरही एक संज्ञाशील माणूस म्हणून जगायचं असेल तर त्यानं 'स्वतंत्र' कृती केलीच पाहिजे. अशा प्रकारची मानवी अस्तित्ववादाविषयीची व नीतिविषयीची जीवनदृष्टी ज्या साहित्यातून व्यक्त होते त्या साहित्याला अस्तित्ववादी साहित्य म्हटले जाते.''[3]

आतापर्यंत आपण अस्तित्ववादाची वैाशिष्टये पाहिली, त्या कसोटयांवर उतरणा–या कथा – कादंब–या गौरी देशपांडे यांच्या आहेत. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

'कारावासातून पत्रे' या लघुकादंबरीबाबत प्रभा गणोरकर म्हणतात,''ही कादंबरी केवळ 'स्त्री' विशयक नाही. 'स्त्रीवादी' नाही. 'स्त्रीवादी' विचारसरणीच्या काही छटा या कादंबरीत व्यक्त होतात. पण ती त्याच्या थोडी पुढे जाऊन मानवी अस्तित्वाशी निगडीत असलेल्या 'मूलभूत स्वातंत्र्याच्या मूल्य कल्पनेचा' विचार मांडू पहाते. स्त्री–पुरूष संबंधामध्ये येणारी 'स्वामित्वा'ची कल्पना गरजेतून निर्माण होणारी 'स्वामित्व' भावनाच इथे नाकारली जात आहे.

स्त्री–पुरूष संबंध ही बाब प्रजननाशी निगडीत असल्यामुळे आणि प्रजनन ही गोष्ट परस्परांशिवाय अशक्य असल्यामुळे वास्तविक पाहता या संबंधांमध्ये दोघांच्याही भूमिका परस्परपूरक आणि म्हणून बरोबरीच्या असणे योग्य होते पण तसे असण्याऐवजी स्त्रीवर पुरूषांचे वर्चस्व रूढी व परंपरांनी निर्माण केले व चालवले गेले. आधुनिक काळात संततीनियमनाच्या साधनांमुळे संतती होऊ देणे वा न देणे हा निर्णय जेव्हा स्त्रीला घेता येऊ लागला तेव्हा 'स्वातंत्र्य' चा एक नवा अर्थ तिच्या ध्यानात आला. वास्तविक पाहता स्वातंत्र्य ही एक मूलभूत गोष्ट आहे व ती माणसाच्या अस्तित्वाशीच निगडीत आहे. किर्केगार्दने व त्यानंतर एकुणच अस्तित्वादी तत्त्वज्ञांनी 'स्वातंत्र्य' या मूलभूत अस्तित्वाशी निगडीत असणा–या पण ब–याच दुर्बोध आणि गुंतागुंतीच्या संकल्पनेचा बारकाईने विचार केला.

गौरी देशपांडे यांची नायिका या युगात वावरते आहे. आई–बापांनी तार्कीक भूमिका ठेवून तिच्यावर संस्कार केले आहेत. ती नुसती शिकलेली नाही. तिने मार्क्स वाचलेला आहे. जर्मनीत तिने काळ घालवलेला आहे. फ्रेंच ती शिकू इच्छिते. तेव्हा आधुनिक काळाच्या वातावरणात, हवेतच असणा–या या सा–या आधुनिक विचारांची तिला नुसती ओळखच नाही. ते तिने श्वासोच्छ्वासाबरोबर आत घेतले आहेत.'[4] प्रभा गणोरकरांचे विवेचन गौरी देशपांडे यांच्या साहित्यातील अस्तित्ववादाची वैशिष्टये दाखविणारे आहे.

लेखिकेने आपल्या कथा कादंब–यातून अनुभव मांडताना जे अस्तित्वात आहे ते तसचं मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या 'आहे हे असं आहे' या कथासंग्रहातील काही कथांत व लघुकादंब–यात विवाहबाहय संबंधाचे चित्रण आले आहे. या चित्रणात आधुनिक व्यक्तीच्या वृत्तीतली सहजता आहे. त्यात अनैतिक–नैतिक इ. मूल्यांचे दडपण नाही किंवा या वर्तनाची सफाई नाही.

वाचकाला हे संबंध कोणत्या तरी प्रकारे 'हरकत घेण्याजोगे' वाटू नयेत अशी धडपड नाही. प्रत्येक कथेत वा लघुकादंबरीत हे संबंध लैंगिक आहेतच असे नव्हे पण कित्येक ठिकाणी ते लैंगिक आहेत आणि काही कथांत दोन पात्रांमधील भावनिक गुंतवणूक इतकी प्रखर आहे की ते कुठल्याही क्षणी शारीरिक होऊ शकतील. शारीरिक संबंध या गोष्टींभोवती असलेली समाजाची समाजसंबंध्द दडपणे उदा. त्यांची गुप्तता, खाजगीपणा, त्यांच्या संबंधीच्या उच्चाराविषयी असणारे अलिखित नियम इ. गोष्टी यांच्या लेखनातील पात्रांना मान्य नाहीत. तसेच वाड्.मयात त्याचे चित्रण करतांना पाळावयाची सूचकता, धुसर गुढता, काव्यात्मता, त्यांचे शारीर पातळीवरचे स्पष्ट रूप टाळून त्यांना दिले जाणारे उदातत्व किंवा त्यांच्यातील स्पष्ट 'शारिर' पण झाकण्यासाठी त्यांना हळूवार कोमल बनवण्याचा प्रयत्न करणे हया गोष्टी लेखिकेने पूर्ण बाजूला सारल्या आहेत. शारीरिक संबंधांमधल्या शरीराच्या प्रतिक्रिया त्यांनी अतिशय सहजपणे वर्णनाचाच एक भाग म्हणून कामूक, शृंगारिक या छटा टाळून न संकोचता पण 'धिटाई' न दाखवता मांडलेल्या आहेत. उदा. 'कारावासातून पत्रे' ची नायिका 'मी' म्हणते, ''अकबरने बोटाबोटांनी, कटाक्षांनी, ओठांनी एक एक इंच जिवंत केलेलं शरीर मोठमोठयानं आक्रोश करीत होतं.'' इथे शरीर ही गोष्ट महत्त्वाची आहे व ते असे जिवंत होते, स्पर्शाने, कटाक्षांनी, दुस–याच्या शरीराच्या सहाय्याने याचा सरळ निःसंकोच उच्चार त्यांनी केला आहे. शरीराला दुस–या शरीराचा मोह पडणे ही एक नैसर्गिक गोष्ट आहे. एका शरीराकरवी दुसरे तृप्त होणे. ही जैविक पातळीवरची, नाकारता येणार नाही अशी वस्तुस्थिती असल्यामुळे तिच्या उच्चारात वा कबुलीत संकोच बाळगण्याचे कारण नाही असा दृष्टीकोण यामागे लेखिकेचा दिसतो.

विवाहबाहय संबंधांच्या बाबतीत 'मध्य लटपटीत' मधील नायिका म्हणते,''करायच असेलं तर उजळमाथ्यानं करावं की, सरळ करतोय हे चूक आहे अस मनाला खात असतांना चोरून चोरून करायचं आणि मग दिसेल त्याच्यापाशी समर्थन. आपल्याला हवं ते करावं, दुस–याला हवं ते करायची मुभा असावी ही भूमिका, मी भावनिक नाही, तरी तात्त्विक दृष्टीकोणातून समजू शकते.'' (मध्य लटपटीत, पृ. 35) किंवा

'काहिं दूरपर्यंत' मध्येही जगन्नाथ व जसू यांच्या विवाहबाहय संबंधांचे चित्रण आलेले आहे. जगन्नाथ म्हणतो, 'किती मऊसूत आहेस तू जसू! जिथे लावावा तिथे हात सुखावतो माझा!'' जसूला हसूच आलं, असं काय विशेष आहे आपल्यात? रक्त–मांस–हाडं गुंडाळून ठेवाण्यासाठी बनवलेली चार माणसांची असते तशीच एक कातडी!'' (काहि दूरपर्यंत, पृ. 119)

'थांग' ची नायिका कालिंदीला इयनचे आकर्षण वाटत असते. त्यामुळे एका अपरात्री इयन दारात उभा राहतो तेव्हा निःसंदिग्ध, मुक्त मनानं ती त्याच्याबरोबर शरीरसुख अनुभवते व त्याचे काहीही समर्थन न करता मान्यही करते. किंवा 'इंडियन समर' या कथेत चाळीशीनंतरच्या भावनिकदृष्टया अस्थिरतेच्या काळात मुलाला मागणी घालणा–या युवकाबद्दल प्रौढ आईच्या मनात निर्माण झालेलं आकर्शण आणि त्याचा संकोच आणि नंतर त्यातल्या वेडपणाची झालेली जाणिव याचे चित्रण आले आहे. अशी अनेक उदाहरणे मिळतात.

गौरी देशपांडे यांच्या लेखनातील स्त्री ही सर्व प्रकारच्या आर्थीक, सामाजिक ताणांपासून दूर असणारी आहे. ती कोणत्याही वर्गाची वा समाजाची प्रतिनिधी नाही. पण तिला एक 'स्टेटस्' आहे. घरात, कुटुंबात, संसारात तिचे एक 'व्यक्ती' असणे, सर्वांनी मान्य केलेले आहे. जिथे तिचे हे 'व्यक्ती' असणे मान्य होत नाही, स्वीकारले जात नाही, तिथे ती बंड करते. स्वतःच्या मार्गाने जाते. भूमिका नाकारणारी अशी ही स्त्री आहे. हे स्वतंत्र असणं आहे. अस्तित्ववादातही 'स्वातंत्र्य' या मूल्याला विशेष महत्त्व दिलेले आहे. त्या कसोटयांवर उतरणारे गौरी देशपांडे यांचे लेखन आहे.

व्यक्तिस्वातंत्र्याबाबतचे 'मध्य लटपटीत' मधील नायिकेचे चिंतन अस्तित्ववादीच म्हणावे लागेल. ती मनाशी विचार करतेय, ''व्यक्तिस्वातंत्र्य आणि लग्न यांची सांगड कधी बसतच नाही का?आपण स्वार्थत्यागाची फारच टिमकी वाजवत असतो. माता म्हणजे स्वार्थत्याग! पत्नी म्हणजे स्वार्थत्याग! मुलांनी आईबापांसाठी, आईबापांनी मुलांसाठी, नव–यांनी बायकांसाठी आणि बायकांनी नव–यासाठी, पुढा–यांनी देशासाठी, देशानं त्याच्या कलेक्टिव्ह भल्यासाठी इ. इ. सारखे स्वार्थत्याग करायचे असतात आणि मग हे सगळयांनी त्याजलेले स्वार्थ कोण उचलून घशात घालीत असतो कुणास ठावे?इतक्या सगळया त्यागानंतर कुणाच तरी भलं झालेलं दिसावं की नाही? पण आई–बाप मुलांच्या नावे, मुलं आई–बापांच्या नावे, बायका नव–यांच्या नावे, नवरे बायकांच्या नावे, देश पुढा–यांच्या आणि पुढारी देशाच्या नावे खडे फोडीतच असतात. सतत, म्हणजे तेल गेलं तुपं गेलं!'' (मध्य लटपटीत, पृ. 53)

स्त्रीमध्ये एक परिपक्वता, समज, उदार माणूसकी, बुध्दिनिष्ठा यायला हवी आहे. त्याशिवाय समान हक्काच्या आणि स्वातंत्र्याच्या गप्पांना अर्थ नाही हा बदललेला दृष्टीकोण गौरी देशपांडे यांच्या कथा, कादंब–यांमध्ये आलेला आहे. म्हणून त्यांच्या कथा, कादंब–या अस्तित्ववादातील 'स्वातंत्र्य' हे मूल्य जोपासणा–या आहेत असे म्हणता येईल.

''आयुष्य ही गोष्ट तशी निरर्थकच तेव्हा ते स्वतःच पोट भरण्यासाठी जगलं काय किंवा दुस–याच काय, ते तितकचं निरर्थक राहणार आपण केवळ जन्माला आलो म्हणून आणि आत्ता मिळत असणा–या किंवा पुढं केव्हातरी मिळणा–या थोडयाशा आनंदाच्या लालचीनं ते जगत असतो. त्यात अर्थ कसला?आणि कारण कसलं?'' (कारावासातून पत्रे, पृ. 9) हा मानवी अस्तित्वाचाच शोध होय. याच कादंबरीतील नायिका मनुला लिहिते की, ''जी गोष्ट कमनशिबानं आपल्या वाटयास येते. तिचा उगीच सद्गुण म्हणून बाऊ करण्यांतली मी नाही. तेव्हा तिचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा पण मूर्ख किंवा स्वैरवर्तनी नाही किंवा तू संधीसाधू आणि आपमतलबी नाहीस हेही पटवून देता आलं तरच. कारण या सगळया अफेअरची कशीही फोड करून सांगितली तरी त्यात दोघांपैकी एकाला दोष देणं आलच. माझ्या लग्नासारखंच झालं ते खरं तर तस कुणाचचं चुकल नाही. कुणाच्याच हातून घोर गुन्हे घडले नाहीत. आम्ही एकमेकांना निराळयाच त–हेची माणसं समजत होतो आणि आम्ही जशी खरी आहोत तशी एकमेकांना दिसल्यावर आमची निराशा मात्र झाली. पण कुणाला कधी सांगतांना एक बरोबर, एक चूक हा भाव येतच राहतो.'' (कारावासातून पत्रे, पृ. 21)

गौरी देशपांडे यांच्या लेखनात कुठेही वास्तवता लपवलेली नाही किंवा आदर्शाचा आव आणलेला नाही. आपल्या भोवतीच्या माणसांच्या अस्तित्वाचा नेमकेपणाने वेध आपल्या लेखनातून त्यांनी घेतलेला आहे. उदा. 'कारावासातून पत्रे' मधील नायिका, 'मनू' ला लिहिलेल्या पत्रात म्हणते,''पारंपरिक मूल्यांशी झगडतांना तू पार दुस–या टोकाला जाऊन पोचलास आणि आपण फार दूर जातोहोत असं वाटल्यानं मग तो झोका दुरूस्त करतांना ओव्हर–करेक्शन करून परत परंपरेच्या पिंज–यात अडकलास. तुला हा सुध्दा प्रश्न कधी सूचला नाही की स्वतःच पोट भरू शकणा–या बायकोचं पोट भरण्याची जबाबदारी केवळ समाज म्हणतो म्हणून नव–यावर का?किंवा आपण असं धरून चालतो की स्वयंपाक करून घालणं, शय्यासोबत करणे, घर चालवणं, याच्या बदल्यात अन्न, वस्त्र, निवारा हा बलुतेदारी व्यवहार दोन व्यक्तीत असू शकतो तर मग त्या तिन्ही गोष्टींवर तुझ्या बायकोपेक्षा माझाच अधिकार जास्त होता. पण केवळ मी स्वतःच पोट भरत होते आणि दोन पायांवर जगाविरूध्द उभी राहिले होते म्हणून आम्हा दोघींपैकी मला सोडून देण्याचा अधिकार तुला कसा प्राप्त होतो?स्वतःला खरंखुरं विचारतोस तर तुला उत्तर मिळालं असतं की, माझी स्वातंन्र्याची आच, इतर चार बाप्यांतली शारीरिक नाही, तरी भावनिक गुंतवणूक, माझा अहंकारी स्वभाव, एकदा हात पोळल्यावर आता कुठल्याही करारात भागीदार व्हायला नकार या सर्वामुळं मजबरोबर आपलं नशीब जोडायची तुला भीती वाटली. आपण एकमेकांबरोबर जे वर्ष काढलं ते कसं खोटनाटं होत बघ. त्याच्यात आपली एकमेकांना काहीही ओळख पटली नाही. आपली समानता खोटी, भावनोद्रेक खोटा, एकमेकांची गरजही खोटीच!'' (कारावासातून पत्रे, पृ. 24)

अस्तित्ववादी जे अस्तित्वात आहे त्याचा माणसानं स्वीकार करावा व आपले निर्णय आपण स्वतः घेऊन त्याचे जे काही बरेवाईट परिणाम होतील ते भोगायला तयार असावं अस मानतात. 'एकेक पान गळावया' या लघुकादंबरीची नायिका राधा अशीच आहे. तिचे पती माधवच्या निधनानंतर तिची मुले येतात. तेव्हा तिची थोरली मुलगी अंबुजा इतका हलकल्लोळ करतेय की राधाला तिला आवरणे जड जाते व तिला आपल्या मुलीचा जरा रागही येतो. तिच्या मनात येते,''म्हणजे नवरा मेलायं माझा आणि ही काय इतका गहजब करतेय?'' थोडया वेळाने जिथे माधवचा मृतदेह ठेवलेला असतो तिथे मुले तिला घेऊन जाऊ लागतात. पण, ''एकाकी तिला ते अफाट, भयंकर वाटलं. तो माधव नव्हता काही. आता तो नुसता एक मृतदेह होता. त्याच्यापाशी जाऊन तिनं काय करावं अशी अपेक्षा होती या मुलांची?हात धरायची?मुका घ्यायची?'नाही नाही' अस फार मोठयानं म्हणून तिनं हात झटक्यात सोडवले आणि जवळजवळ पळतच रस्ता गाठला. किंवा माधव राधाला म्हणायचा,''मुलं या प्राण्याचे लोक हे प्राणी झाले की त्यांना 'लोकां'सारखंच वागवायचं!'' (एकेक पान गळावया, पृ. 95 व 123)

'मी' तेरूओला सांगते, ''मी अमेरिकन आहे की फ्रेंच आहे की आफ्रिकनं आहे की हिंदी आहे याच्याशी मी 'मी' असण्याचा काय संबध?मी एक बाई आहे, एक माणूस आहे आणि आहे ही अशी आहे. झालं?(तेरूओ, पृ. 26) तर 'काहिं दूरपर्यंत' मधील ओरूंनदा तुलसीला सांगतात, ''आयुश्याच्या शेवटीचं स्वार्थत्याग फोल वाटतात, सुटलेल्या संध्या सोनेरी वाटतात आणि घडलेली मूर्खपणे महामूर्खपणे वाटतात.'' (काहिं दूरपर्यंत, पृ. 140) अशी अनेक अस्तित्ववादाची उदाहरणे होत.

'निरगाठी' या लघुकादंबरीत 'आईपण' किंवा 'वात्सल्य' या भावनेचा गौरवात्मक उल्लेख वा उदोउदो क्षणभरही केलेला नाही. वास्तविक तो समाजात वर्षानुवर्षे चाललेला आहे पण इथली नायिका म्हणते,''आयुष्यातली पंधरा–वीस वर्ष वजाच करायची की काय मुलांसाठी असं मला वाटायला लागलं.''(निरगाठी, पृ. 44) अर्थात हे वाटणं चुक वा अनैसर्गिक मुळीचं नाही. संकेतांची ओझी न ठेवता

जगू पाहणा–या एखाद्या स्वतंत्र व्यक्तीला 'स्वतःचे' असे जीवन 'मुलांचे करता करता' हातातून निसटून जात आहे असे वाटू शकते. याचा अर्थ ती वाईट आई असा करता येणार नाही. ती पुढे म्हणतेय,''आईपण हे किती कंटाळवाण, रिपिटिटिव्ह, जखडून टाकणार, मना–शरीराचा फडशा पाडणारं असतं.'' (निरगाठी, पृ. 44) हे वाटणे देखील खरे आहे व ते कोणीतरी सांगणे गरजेचे असते. याबरोबरचं मुलांनाही आईची भीती वाटते, आईला टाळावेसे वाटते. इतर नात्यांसारखेच आई मुलांचे नातेही बंधन निर्माण करणारेच असते. असे एखाद्या आईला, एखाद्या स्त्रीला वाटू शकते. त्या वाटण्याचा प्रामाणिक उच्चार येथे केला आहे.

'निरगाठी' ची नायिका म्हणते की, ''पावलामागून पाऊलं टाकलं की वाट सरते. क्षणामागून क्षण उलटले की दिवस सरतो. दिवसांमागून दिवस उलटले की मृत्यू येतो. पानामागून पान लिहिलं की डायरी संपते....... व यानंतर ती आपल्या मिमी व शमी या मुलींना लिहिते,''आमच्या मृत्यूने, अशा आत्महत्येने – तुम्हाला सर्वप्रथम दुःखा ऐवजी राग, तिटकारा वाटेल हे आम्ही जाणतो. कारण आत्महत्या करणारा सुटून जातो पण मागे उरलेला फुकट स्वतःच्या आणि इतरांच्या लेखी अपराधी ठरतो. म्हणून हा पत्राचा उपद्व्याप. आमच्या आयुष्यात तुम्ही दोघींनी निव्वळ आनंद निर्मिला असे जर आम्ही आता म्हणालो तर तो भोंदूपणा होईल. कारण ते खरे नाही. हे आपणतुपण जाणतोच. तेव्हा असे म्हणतो की, तुमच्यामुळे आमच्या आयुष्यात हालचाल, चढ–उतार, मनोरंजन, चैतन्य, कटकटी, निराशा, दुःख, हास्य, सुख, आशा अशी उत्तेजित कारंजी फवारत राहिली आणि त्याबद्दल तुमचे मनापासून आभार.'' असा निर्णय घेण्याबद्दल ती सांगते,––– गेल्या तीन चार वर्षात आमचे अनेक स्नेही गळून पडले आणि त्यानंतर गेल्या वर्षीचा ताई–भैयाच्या अपघाती मृत्यूचा अखेरचा फटका आम्हाला जवळजवळ दुःसहय होता. आपल्या आयुष्याचा स्थायिभावच आता दुःख व हळहळ असेच आम्हाला वाटू लागले. केवळ गेल्या दिवसांसारख्या आणखी एका दिवसाची आयुश्यात भर घालणे आम्हास निरर्थक वाटू लागले. आपण काय म्हणतोय ते समजणारे, आपल्या आठवणीत सहभागी होणारे फारसे कुणी उरले नाही ही जाणिव दृढ होत गेली. आपल्याला फक्त आपण उरलो आणि त्यातून एक गळून पडला तर तो आघात सहन करणे आता दुस–याच्या शक्तीबाहेरचे आहे. हेही ध्यानात आले. तुम्हाला दुःख होईल खरे, पण आईबापांच्या मृत्यूचे दुःख सर्वांनाच आज ना उद्या पचवायचे असते अशी मनाची समजूत घातली.

आपण चौघांनी एकमेकांवर पुष्कळ माया केली, एकमेकांना या ना त्या रीतीने पुष्कळ जडवल, घडवलं, खूपसं दिलं, खूपसं घेतलं यातच सर्व. इथवर आम्हा दोघांच. आता पुढच्या काही ओळी या फक्त आईच्या, हे वाचूनही समजेलच.

हे आजच का करायचे ठरवले असे तुम्ही म्हणालं, ना आपली कुणाची वा लग्नाची वा घराची जयंती, ना विशेष कुणाची मयंती, मग 17 नोव्हेंबर या दिवशी विशेष काय आहे?आजच आम्ही 'आता पुरे' हे का ठरवले?अशी काय गोष्ट घडली?उत्तर इतके साधे आहे की हसाल. आज वर्तमानपत्राची वार्षीक वर्गणी संपली आणि ती पुन्हा भरून आणखी वर्षभर ते वर्तमानपत्र आणि त्यातील असंबध्द, निरर्थक बातम्या वाचायचा कंटाळा आला! माझ्या लाडक्यांनो, आनंदात असा, जपून असा, पण इतके नका जूप की, अनुभव तुमच्या कुंपणांना घाबरून पाठच फिरवून निघून जातील! आमचे सर्व शुभाशिर्वाद!'' (निरगाठी, पृ. 99) हे अस्तित्ववादाचे अतिशय उत्तम उदाहरण होय.

'चंद्रिके गं, सारिके गं' या लघुकादंबरीतील 'सुहास' ने आपल्या आयुश्याचे सारे निर्णय स्वतः घेतलेले आहेत. त्यामुळे त्याच्या होणा–या ब–याबाईट परिणामांबद्दल तिची कुठेही तक्रार दिसत नाही. अस्तित्ववादालाही हेच अपेक्षीत असते.

'दूस्तर हा घाट' मधील नमू म्हणते,''माणूस माणसाला आपलं अंतरंग हवं तितकं, हवं तंस हवं तेव्हा किंबहुना कामी येणार असेत तर सांगतो!'' ती पुढे म्हणते, ''खेरीज शेक्सपियर जो आहे तो आहे – तो बदलतो तो फक्त माझ्यातल्या बदलाप्रमाणे माझं आकलन बदलत तेवढा बदलतो खराखुरा माणूस........'' (दूस्तर हा घाट, पृ. 20) किंवा हरिभाई नमूला म्हणतात, ''आम्ही दोघांनी तुझ्या आयुश्यात ढवळाढवळ केली नसती तर आज तू तुझ्या स्वतःच्या मुलामाणसांत रमलेली असतीस, स्वतःच्या जिवावर अन् आयुष्यावर ताबा सांगू शकली असतीस, नव–याशी कडाडून भांडू शकली असतीस, तशीच त्याच्या बरोबरीने हसत–रडत–ठेचकाळतं–धावत–दुखावत–सुखावत दिवस काढत असतीस.......'' यावर तिला आठवते ते कीर्केगार्द म्हणतो ते, की,''आयुश्याचा अर्थ मागे वळून बघतांना लागतो. पण ते जगावं मात्र लागतं पुढे बघत.'' पण नमूला वाटले मागे वळून बघतांना तरी कुठे लागतो आयुष्याचा अर्थ?कळते इतकेच की आपण जे जगलो, दहा वर्षे जगलो, पंधरा वर्षे जगलो, इतकेच.'' (दूस्तर हा घाट, पृ. 66) अशा अस्तित्ववादाच्या खुणा या लघुकादंबरीतही आहेत.

'थांग' आणि 'मुक्काम' ची नायिका 'कालिंदी' ला दिमित्री म्हणतो,''तू मनात इतके त–हेत–हेचे विचार करतेस, त्यात हाही का नाही करत?आपण कोण आहोत?या जगात आयुष्यात काय हवंय आपल्याला?काय प्रयोजन आहे आपलं?आयुष्यानं हाणलेला चेंडू परतवण्यापलिकडे कधीच काही होणार नाही का आपल्याकडून?हे तिचे प्रश्न स्वतःचा शोध घेणारे असे आहेत.'' आणि ती नव–याला सोडते. नोकरी शोधते. नोकरीसाठी खेडयात राहाते. तिला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. पण तरीही ती त्यात समाधानी असते. अस्तित्ववादात स्वतःचे निर्णय स्वतः घेणे व त्याच्या ब–यावाईट परिणामांची जबाबदारी स्वतः स्वीकारणे हे अपेक्षित असते.

'गोफ दुहेरी' या लघुकादंबरीतील वसुमती आपला मुलगा आदित्यला भेटायला दर शनिवारी जात असते. त्यावर ती म्हणते,''गेल्या शनिवारी तो म्हणाला, अगदी दर वीकेण्डला नाही आलीस तरी चालेल आई. मी ठीक आहे' त्यावर ती म्हणते,'कसे सांगायचे त्याला की, जिवाचे रान करून एवढी येते ती, तो ठीक नसेल म्हणून नाही तर मी ठीक नसते म्हणून. त्याला भेटल्यावर पुढचे दोन दिवस कामाचे काही वाटत नाही. '' पण कुठेतरी मनात ठसठसते की आदित्यलाच नाही ना कंटाळा येत?आईबरोबर भटकण्यात त्याला काय गमंत वाटत असणार? त्यापेक्षा मित्रांच्या घोळक्यातच.......?अगदी दोनतीन वर्षामागेसुध्दा सुट्टी संपवून परत शाळेत जातांना रडायचा. पण तीच तर गोची आहे आईपणाची. जितके आईपण यशस्वी तितक्या लौकर मुलांना त्याची गरज वाटेनाशी होते.''(गोफ दुहेरी, पृ. 46) किंवा 'मां' म्हणतात,''प्रेमाच्या भावाभावांना लोक राम–लक्ष्मणाची उपमा देतात. ती मला मुळीच पटत नाही. इतका पडखाऊ एक भाऊ की दुस–याचा चाकरच वाटावा. मग नाही जमल त्यांच तरच नवल.''(गोफ दुहेरी, पृ. 46) तर 'उत्खनन' मधील दयाल म्हणतो,''दुनिया बरोबरचं माझं आयुष्य फार आनंदात गेलंय. मी पोरका होतो तर मला एकटी तीच नाही तर एक घसघसीत कुटुंबकबिला मिळाला आणि मुख्य म्हणजे मणी मिळाली. ती 'माझी' आहे असं म्हणत नाही कारण ती खरी तर तिचीचं आहे. आणि तिनं असं तिच 'स्वतःचः व्हावं याला माझा हातभार लागला, याचा अभिमान आहे मला.'' (उत्खनन, पृ. 192) अशी अनेक उदाहरणे गौरी देशपांडे यांच्या कथा आणि लघुकादंब–यामध्ये अस्तित्ववादाची मिळतात.

अंजली कीर्तने गौरी देशपांडे यांच्या लेखनातील स्त्रीबद्दल जे लिहितात, ते अस्तित्ववादाच्या अनेक वैशिष्टयांवर प्रकाश टाकणारे आहे. त्या लिहितात,''ही स्त्री नेमकी आहे तरी कशी? सर्वप्रथम जाणवतो तो तिचा स्वयंभू मुक्तपणा. तिनं स्वतःला मुद्दामहून कोणत्या तरी जोखडातून मुक्त करून घेतलेलं नाही. मुक्तपणा हीच तिची सहजस्थिती आहे. तिची निश्ठा स्वतःवर आहे. माझ्या मनाला योग्य वाटेत ते मी करणार, हा तिचा बाणा, तिचं आयुष्य जगण्याचं सूत्र आहे. तिच्या इच्छा, आकांक्षा, सहजप्रेरणा, लालसा, भावना, प्रमाण मानून ती जगते. त्याबद्दल तिला अहंकार नाही आणि अपराधीपणाही नाही. तिच्या दृष्टीनं हे असचं जगायचं असतं. यापेक्षा वेगळ जगणं असूच शकत नाही. 'कारावासातून पत्रे' मध्ये 'मी' तिच्या जगण्याच सूत्र असं सांगते, ''आपल्याला जे बुध्दीनं पटलं, जे सहजप्रवृत्तीनं करायला भाग पाडलं व जे समाजघातक नाही ते करायला लागणारा आत्मविश्वास. मग लोक गेले खड्डयात!'' व्यक्तिस्वातंत्र्याच हे तत्त्व केवळ स्वतःपुरतं नाही. इतरांशी वागतांनाही तेच तत्त्व आचरणात आणलं जातं. विवाहीत पुरूषाच्या प्रेमात पडलेल्या मुलीला – नीरजाला 'एकेक पान गळावया' मधील राधा सांगते,''आयुष्य तुझं आहे, त्यातले निर्णय तू घ्यायचेस. मी तुझा निशेधही करत नाहीये आणि वाहवाही. पण निदान तू स्वतःची प्रतारणा करू नकोस!''

व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य मानणा–या या स्त्रीच्या मनावर नीती–अनीतीच्या पारंपरिक कल्पना, नैतिक संघर्श, समाजभय, समाजनियमांचा भंग, कुटुंबपध्दतीची आचारसंहिता या कशाचंही ओझ नाही. तिला स्वतःचेही भय नाही. कारण ती स्वतःला स्वतःपासून लपवत नाही. उलट स्वतःच्या लालसा, वासना, शरीर संवेदना, आसक्ती यांना 'आहे हे असं आहे' अशा प्रांजळपणे स्वीकारते. म्हणून स्वतःला नाकारण्यातून निर्माण होणारी आत्मपीडाही इथे नाही.

स्त्री–पुरूषातील शारीरिक ओढ, त्यातील आकर्षण, चैतन्य, तिच्या ठायी काठोकाठ आहे. 'माझी कामवासना तृप्त कर' असं पुरूषाला सांगणा–या महाभारतकालीन स्त्रियांइतकीच ही धीट, प्रामाणिक आणि पुढाकार घेणारी आहे. हे आकर्षण चुक का बरोबर, नैतिक का अनैतिक, विवाहितेने इतर पुरूषांचा असा लोभ ठेवावा का न ठेवावा, असे ताण तिच्या मनात निर्माण होत नाहीत. तिची दृष्टी न–नैतिक आहे. तिची निष्ठा असलीच तर स्वतःच्या भावनांशी, संवेदनांशी प्रामाणिक राहण्यात आहे.'' अंजली कीर्तने यांचे हे विवेचन वाचताना अस्तित्ववादाच्या वैशिष्टयांशी असलेले त्याचे साम्य आपल्या सहज लक्षात येते.

अशा प्रकारे गौरी देशपांडे यांच्या साहित्यात अस्तित्ववादाची अनेक उदाहरणे सापडतात. अर्थात आधुनिकता स्वीकारली असल्यामुळे अशी उदाहरणे मिळतात असेही म्हणता येईल. कारण आजच्या आधुनिक जीवनातही प्रामुख्याने 'स्व' च्या शोधाला म्हणजे मानवी अस्तित्वाच्या शोधाला व 'स्वातंत्र्य' या मूल्याला विशेष महत्त्व आहे. असे असले तरी एकंदरीत गौरी देशपांडे यांच्या साहित्यात अस्तित्ववादाची अनेक वैशिष्टये पहावयास मिळतात. म्हणून त्यांना अस्तित्ववादी

लेखिका म्हणता येईल.

### *4. संदर्भटीपा :–*

1.'अस्तित्ववादाची ओळख' – दि. के. बेडेकर, व्हीनस, पुणे, मार्च 1972, पृ. 19 व 34.

2.'अस्तित्ववादाची ओळख–दि.के. बेडेकर' परीक्षक–वा.प्र.पांडे, प्रतिष्ठान, मार्च 1973,पृ. 38.

3.अस्तित्ववाद – गंगाधर पाटील, साहित्यसूची, जून 1991, पृ. 10.

4.'गौरी देशपांडे एका दिशेने सुरू असलेला प्रवास' – प्रभा गणोरकर, मिळून सा–याजणी, दिवाळी विशेषांक, 1990, पृ. 84.

5.'दशकातील साहित्यिक : गौरी देशपांडे' –अंजली कीर्तने, ललित, मार्च 1989, पृ. 11 व 12.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net